# अखंड सावधान असावे

**लेखक**
हिंदुहृदयसम्राट स्वातंत्र्यवीर
**विनायक दामोदर सावरकर**

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

---

प्रमुख वितरक
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**अखंड सावधान असावे : विनायक दामोदर सावरकर**

**© हिमानी सावरकर**

**जनआवृत्ती संकल्पना : श्री. नानासाहेब गोडसे**

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शीतल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**दुसरी आवृत्ती**
मे, २०१२ - २००० प्रती

**किंमत**
जनआवृत्ती रुपये १००/-

# अखंड सावधान असावे

# अखंड सावधान असावे

(स्वातंत्र्यवीर सावरकरांनी मार्च/एप्रिल १९२५ मध्ये ५७ वर्षांपूर्वी लिहिलेले आणि त्यावेळच्या 'लोकमान्य' ह्या मुंबअीच्या वृत्तपत्रांत 'हुतात्मा' या टोपण नांवे प्रसिद्ध झालेले हे लेख आज प्रथमच पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहेत. ५७ वर्षांपूर्वी लिहिलेले हे लेख आजच्या काळालाही किती अुपयुक्त आहेत ते आपणच ठरवा.

**लेखांक १**

प्रत्येक कार्याला विशिष्ट चालना मिळवायला काही विशिष्ट प्रसंग यावे लागतात. हिंदूंना आपली राष्ट्रीय व धार्मिकदृष्ट्या संघटना करण्याच्या आवश्यकतेचा प्रसंग त्यांच्यावर सन ९९७ च्या सालापासून आलेला आहे. परंतु स्थानिकदृष्ट्या प्रत्यक्षीभूत झालेल्या संकटाशिवाय हिंदु लोक भावी संकटाच्या घातुक आक्रमणाचा विचार करून विराट रूपाने केव्हांहि-प्रयत्न करतांना, एखाद दुसरा अपवाद शिवाय करुन, केव्हांहि दिसले नाहीत. आणि त्यामुळे संकटांना स्वस्थपणानें, सवडी सवडीनें व जमेल तसे हिंदुजातीवरील आक्रमणाचे राक्षसी महत्त्वाकांक्षेचे चाळे आजपर्यंत अव्याहत चालविता आले.

स्वार्थांध जयचंदाने आपल्या पायापुरतें पहात स्वार्थाच्या खोट्या मोहाला बळी पडून येणारे संकट सर्व जातीला व राष्ट्राला ग्रहण लावील इकडे लक्ष न देता, नीच भावनेने जेव्हा देशद्रोहाचे व जातिद्रोहाचे बीज पेरलें, तेव्हांपासून तें बीज सारखें कळत वा न कळत सर्व हिंदुस्थानभर अंकुर बाहेर टाकीत चाललें. त्या जातिघातकी स्वार्थबुद्धीच्या ज्वाळानीं सर्व देश होरपळत चालला. पृथ्वीराज गेला, बाकीचे रजपूत स्वस्थ. उत्तर हिंदुस्थान मुसलमानांच्या दाढाखाली रगडला जाऊ लागला, दक्षिण

हिंदुस्थान गप्प. प्रत्यक्ष दक्षिणेंतील अर्ध्या भागात मुसलमानांचा रोवला गेलेला पाय उखडून टाकून पुन्हा हिंदुपदपादशाही जिवंत करण्याचा भगीरथ प्रयत्न दैवी सामर्थ्ययुक्त रामदासांच्या साहाय्यानें दिव्यात्मा श्रीशिवराय करित असतां पंचद्रविड प्रांत (मद्रास, मलबार, म्हैसूर इ.) घोरत असलेले. कारण मुसलमानांचे भय वा संकट आमचे येथें, आमच्या धर्मचक्षुंनां प्रत्यक्ष दिसणारें, आम्हांला प्रत्यक्ष भ्रष्ट करीत असलेलें, आमच्या आया बहिणींवर आमच्या डोळ्यांसमोर बलात्कार करित असलेलें असें कोठें दिसत आहे? कोणी किंचित दूरदृष्टीचे डोळे आपल्या कंठातून भावी संकटाची आरोळी त्या वेळींहि देत असतील पण असल्या वेडेपीरांकडे वा प्रत्यक्ष न दिसता फार दूर कोठे तरी अस्तित्वात असलेल्या संकटासाठी घाबरून जाणाऱ्या घाबरटांकडे हे धीर व वीर पुरुष काय म्हणून ढुंकून पाहतील? काय! त्यांच्या अंगात संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य नाही? यांनी भविष्यकाळी येणाऱ्या व वर्तमान काळी केवळ कल्पनाशक्ति ला दिसणाऱ्या संकटाला काय म्हणून भ्यावें? असल्या आत्मघातकी ढसराईखोरपणानें मुसलमानी संकटांनी सर्व देश आक्रांत झाला. सैनिक हल्यानें त्यांनी आमचे पासून राज्यच हिरावले असें नाहीं, तर धार्मिक आक्रमणांनी आमच्या अंगांतील मांसाचे लचके तोडून आम्हांला रोड केलें व आपली संख्या वाढविली. छलानें व बलानें, फुसलावणीनें व विशेषत: अत्याचारानें कोट्यवधि हिंदूना आपल्या धर्मातून ओढून नेले. या दोन शक्तिच्या संघर्ष काळांत तिसरी एक शक्ति आली आणि पूर्व संकटांशीं झगडत झगडत त्या शत्रुशक्ति ला चीत करून उसासा टाकते आहे नाहीं तोंच ही तिसरी शक्ति बलापेक्षां विभेदक नितीचाच स्वत:च्या पूर्ण सामर्थ्याभावीं, अवलंब करून त्या उभ्या होऊं पहाणाऱ्या हिंदुशक्ति चे विभेदक नीतीने तुकडे पाडून व त्यांचीच शक्ति त्यांच्याच विरुद्ध खर्ची घालून सर्वांना चीत करीत स्वत: स्थिर झाली. याहि वेळीं हिंदुजातीची पाया पुरते पहाण्याची आत्मघातकी कृतीच त्यांचे नाशास कारणींभूत झाली. शिंदे लढले. बाकी स्वस्थ. होळकरांनें हात उचलला इतर तमाशा पहाणारे. पेशवे धडपड करतात तर सातारकरांना राज सत्तेच्या मोहानें गुरफटवून इंग्रजांच्या कच्छपीं लावलेलें. शीखांनी हात हलविले त्या वेळी इतरांनी डोळे मिटलेले, अशी धुळधाण उडाली. ५७ च्या उत्तर हिंदुस्थानच्या ज्वालामुखीच्या स्फोटाच्या वेळी दक्षिण हिंदुस्थानांतील मराठे सिंह 'पाहू या तिकडे काय होतें ते! नाही तर मागाहून आपण आहोंतच!! मागाहून कशाला! मरावयालाच ना? आणि



तिकडे तर प्रत्यक्ष शीख व गुरखे त्या जातीय उठावणीच्या विरुद्ध शस्त्र घेऊन उठलेले!! जणु काय त्या वेळच्या हिंदुस्थानच्या प्रयत्नांस यश आलें असतें, तर हे ठार झाले असते व ते उठाव अगदी चिरडून टाकल्यामुळें आता हे अजरामर झालेले आहेत!

आणि आज काय आहे? पायापुरतें बघून भावी संकटाचें दूरदृष्टीनें आकलन न करतां स्वस्थ घोरत पडण्याच्या आक्काबाईनें घेरलेली आमची बुद्धि विचारहीन, मठ्ठ व धुंद झालेली. हिंदुमुसलमानांचा प्रश्न पंजाबमध्ये तीव्र पण महाराष्ट्रांत तसा कोठें आहे? मलबारांत हिंदूंवर अत्याचार व बलात्कार झाले, येथले मुसलमान असे कोठे करतात? निजामशहा व भोपाळची बेगम मुसलमान असल्यामुळें हिंदुप्रजेशीं अन्यायानें वागत असतील; पण आमचे संस्थानिक तर हिंदू मग आम्हीं त्याचा विचार करण्याचें काय कारण? असले आम्हीच बुद्धीचे तारे तोडणार; पण एवढे लक्षांत येत नाही कीं, हा जाती जातींमधील संघर्ष सुरू झालेला आहे. यामध्यें येथील मुसलमान वा तेथील मुसलमान अथवा इकडचा प्रांत वा तिकडचा प्रांत असा भेद आत्मघातकी झाल्याशिवाय रहाणार नाही. नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं अशी आपल्यांत एक म्हण आहे. जेथे संख्याबलानें वा सत्ताबलानें मुसलमान हिंदुपेक्षा प्रबल आहेत तेथें हिंदुवर त्यांच्याकडून उघड उघड जुलूम व अत्याचार होत आहे. हें बंद करावयाचें असेल, तर जेथे जेथे ते संख्येनें वा सत्तेनें आपणांपेक्षा कमी आहेत, तेथें तेथें त्यांच्यावर आपला दाब पाडल्याशिवाय, त्यांना 'दे माय' केल्याशिवांय जेथें आपण कमी आंहोंत तेथें आपला 'धरणी ठाय' लागणार नाही. ही साधीहि गोष्ट आपल्या लक्षांत येऊं नयें इतकें कां आपण बुद्धिहीन व्हावें?

शिवाय आतांची वेळ हिंदुवरील संकटाचे परमावधीची आहे. या संकटाला डोळे उघडून सुसंघटित, व प्रबल होऊन जर हिंदुजाति तोंड देणार नाहीं, तर-तर तिचें मरण अगदीं निश्चित आहे. अशा स्थितींतच हात पाय न हालवतां यद्दच्छया येणाऱ्या आपत्तींच्या भोवऱ्यांत गिरक्या खात, जर ती राहिलीं तर आणखी २५-३० वर्षांत जगातून अदृश्य होत आलेली व मरणाच्या प्रत्यक्ष जबड्यांत सांपडून भरडून जात असलेली अशी ती दिसेल.

संकट तरी कोणतें हें कळावयाला पाहिजे. त्याशिवाय संकटाची यथायोग्य कल्पना व त्यांतून सूटकेचे मार्ग हे कळणार नाहींत. एक परतंत्रता हें तर भयंकर संकट हिंदुजातीला भरडीत व चिरडीत चाललेंच आहे. परंतु ते संकट कायम राहून तें

अद्याप स्थिर असतांनाच आल्यापुढें त्याहून अधिक भयद व नाशकारी असें दुसरे संकट अधिक प्रबल वेगानें हिंदुजातीवर आक्रमण करूं पहात आहे. मुसलमान जाति आज हजार वर्षे हिंदुजातीला कधीं छलानें वा बलानें तर कधी फुसलावणीनें, कधी हात धुवून पाठीस लागत तर कधीं सवडी सवडीनें वैयक्तिक व सांघातिक प्रयत्न करीत पोखरीत चाललेली आहे आणि सर्व हिंदूच हिंदू होते त्या या

हिंदूंच्या-हिंदुस्थानांत

परक्या देशांतून आलेल्या मुसलमानांची सुमारे ५० लाख संख्या वजा करता ७ कोटींपैकी ६।। कोटी मुसलमान आहेत. हिंदू जातीच्या अंगप्रत्यंगांचे हे ६।। कोटी मासाचे गोळे त्या दुष्ट संकटानें तोडून नेलेले आहेत. आतां हिंदुजाति ही दुर्बल जीवन धारण करीत, आपसांतील द्वेष भावनांच्या ठणक्यानें सर्वांग दु:खी झालेली अशी श्वासोश्वास करीत उभा आहे. केव्हां, कोठून व कसा एखादा भयंकर आघात आपल्या या आघातग्रस्त मानेवर येऊन आदळेल व हिला जमीनींवर खिळवील याचा नेम नाही.

**लेखांक २**

तरी पण जर तिची राहिलेलीं अपत्ये,

कलही परस्परांच्या तेही शतसंख्य आणि आम्हि पांच।।

परि अन्यशत्रुघाती आम्ही आहोंत एकशे पांच।।

ही मयूरोक्ति ध्यानांत ठेवून व तदनुसार निरपवाद प्रयत्न करून, जर आपल्या मातेचें दु:ख कमी कमी करीत तिला दु:खमुक्त करण्याचा प्रयत्न करतील तर लवकरच ही सनातन धर्माच्या आश्वासानानें आश्वासित व प्रतिपालित जाति, पुन: आपल्या अंगावरील जरा फेकून देऊन दैदीप्यमान स्वरुपानें दुष्टांच्या डोळ्यांना तिरमिरी आणील व साधूंच्या नेत्रांना रिझवीत राहिल. परमेश्वरांच्या अवतार कार्याचें हेंच फल आहे त्याचें अभिवचन आहे की,

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।।

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम।।

परंतु जेव्हां पांडव उद्योग पर्वातून जातात, जेव्हां अर्जुन युद्धकलेंत कृतेविद्य होतो, जेव्हां सर्व पांडव आपलें बल संग्रहित, सुसंघटित व सिद्ध करतात, प्रतिपक्षाच्या भीष्मप्रतिज्ञ सेनापतीशीं तोडीस तोड मिळावी म्हणून जेव्हा पांडवपक्ष भीमकर्म



सेनापतीच्या नियंत्रणाखालीं कार्योद्युक्त होतो, तेव्हां धर्माचा त्राता व अधर्माचा काळ कार्यरथाची सूत्रे हातात घेऊन दिव्य सारथ-कर्म करीत पांडव पक्षाला यशस्वितेच्या शिखरावर नेऊन विराजमान करतो. परमेश्वर आपल्या अभिवचनाप्रमाणे धर्मरक्षण कार्य करण्यास समुद्युक्त आहेच. केवळ आपल्या स्वत:च्या पूर्वसिद्धतेच्या सामर्थ्यानें युक्त असे आवाहन मंत्र म्हणावयास मात्र आपण आरंभ केला पाहिजे.

ख्रिस्ती व मुसलमान लोकांनी आतांपर्यंत हिंदुच्या धर्ममंदीरावर वारंवार हल्ले करून, त्याचा बराच भाग कोसळविला आहे. तरी हिंदू अहंकाराच्या धुंदीनें असावध राहिलें, इतकेंच नव्हें तर ज्या प्रबलतर समाजानें हिंदू जातीच्या शरीराचे लचके तोडीत साडेसहा कोटि मांसाचे गोळे तोडून नेले, त्याच समाजाला तो किंचिन्मात्र जागृत, विस्कळित, विखुरलेला व डोळे मिटून पडलेला असतांहि खिलाफतीच्या चळवळीचें दूध पाजून, त्याला संघटना-सामर्थ्ययुक्त केलें. खिलाफतीचा पुरस्कर्ता हिंदू. खिलाफतीचे उपदेशक हिंदू. खिलाफतीचे कार्यवाह हि कित्येक ठिकाणीं हिंदूच होते. खिलाफतीला पुष्कळसा पैसा दिला. हिंदूनी आणि या धर्मवेडाच्या सापाला डवचवून आपणांवर फणा फेकीत विषदंश करून घ्यावयास समर्थ करून ठेवलें आहे. मुसलमान समाज जागृत व्हावयास पाहिजे होता. हिंदुस्थानातील मुसलमान राहणार हिंदुस्थानांत, देह ठेवणार हिंदुस्थानांत, पोसणार हिंदुस्थानच्या अन्नावर व म्हणून त्यांच्या अंत:करणाचा भक्तिकेंद्रहि हिंदुस्थानच होणें हें अगदी क्रमप्राप्त, स्वाभाविक व सुयोग्य झालें असतें. परंतु प्रत्यक्ष वस्तुस्थिती अगदी याच्याउलट! इटलीनें तुर्कीशीं खाजव खाजवी केली, त्या वेळीं मुसलमान जितके भक्तीनें, तुर्कीच्या बऱ्यावाईटाकडे डोळे लावून पाहात होते, तितका हिंदुस्थानावरील संकटानें त्याच्या अंत:करणाला पीळ पडत नव्हता. हिंदुस्थानातील राष्ट्रीय चळवळीच्या वेळी मुसलमान हे ‘‘आवडती बायको’’ म्हणवून घेण्याचा स्त्रीलिंग मान मिळवून घेण्यांत चूर झाले होते; पण इटलीला इंग्लंड अप्रत्यक्ष कां होईना, परंतु तुर्कीविरुद्ध पाठबळ देत आहे; असे पाहतांच ही आवडती पट्टराणी त्या प्रिय पतीवर गुरूगुरूं लागली होती. म्हणजे हिंदुस्थानच्या हितानहिताशीं आपलेपणाचा संबंध न ठेवतां, हे हिंदुस्थानांतील मुसलमान हिंदुस्थानच्या बाहेरील देशाच्या हितानहिताशीं आत्मीयतेचा संबंध ठेवीत आहेत ही गोष्ट अस्वाभाविक, हिंदुस्थानच्या राष्ट्रीय हिताशी विरोधी व हिंदुजातीला प्रत्यक्षत: पुढे मागे केव्हांतरी हानिकारक आहे हें स्पष्ट सत्य हिंदूच्या सात्विक नांवाच्या

पांघरुणाखाली असलेल्या तामसीपणाच्या धुंदीला कळलें नाही आणि म्हणून आत्मघातकी होणाऱ्या खिलाफत चळवळीची आफत (आफत या उर्दू शब्दाचा अर्थ संकट असा आहे.) आपल्याच डोक्यावर असमर्थ हातातील उत्तोलित गदेप्रमाणें येऊन आदळेल हें न कळल्यामुळे त्या खिलाफतीला उचलून धरून, मुसलमानाचा आधीच हिंदुस्थानाबाहेर डोकावूं पहाणारा भक्तिकेंद्र हिंदूंनी आपल्या हातांनी उचलून धरून, परक्या देशाच्या हिताहिताच्या क्षेत्रांत नेऊन स्थिर करून ठेविला आणि हिंदुस्थानातील राष्ट्रीय हिताला भयंकर संकट उत्पन्न करून ठेवलें.

तुर्कस्थानचा प्रश्न सुटण्याच्या पंथाला लागतांच मुसलमानांची कारणापुरतीच वरकांती दाखविली जाणारी आत्मीयं वृत्ति डगमगूं लागली. मुसलमानांच्या अंगात पहिल्याच जीव धरून असलेल्या धर्मवेडाला खिलाफतीच्या चळवळीनें मिळालेल्या असामान्य चालनेंमुळे तीव्र स्वरुप येत चाललें. हिंदुस्थानांत राजकीय चळवळीत ध्येय स्थानीं असलेल्या 'स्वराज्या'चा अर्थ मुसलमानांच्या मनात 'मुसलमानांचे राज्य' असा होंऊ लागला. त्याचें प्रत्यक्ष प्रत्यंतर मलबारांत दिसून आलें. ''मी आधीं मुसलमान व मग हिंदी, ''इस्लामच्या वैभवांकरंता हिंदुस्थानच्या हिताचा विचार मला दूर ठेवावा लागेल'' (हिंदुस्तांनच्या मानेवर कोणत्याहि मुसलमानी सत्तेचे दांत रुपले जावें, हें सुद्धां इस्लामचें वैभवच आहे; तेव्हा ''इस्लामचे वैभव'' या शब्दयोगाची व्याप्ति हिंदूंनी नीट लक्षांत घ्यावी.) ''एखादा दुराचारी मुसलमान देखील केवळ तो मुसलमान आहे म्हणून हिंदुमधल्या महात्मपदाचा मान दिला गेलेल्या गांधींच्याहून सुद्धां श्रेष्ठच आहे'' इत्यादि अंत:स्थ विचार चित्राची कल्पना देणारीं वाक्यें आणि कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरुन हिंदूंच्या मानभूमीवर पाय आदळींत ''सातकोटी अस्पृश्यातले साडेतीन कोटी अस्पृश्य आम्हांला द्या व साडेतीन कोटी अस्पृश्य तुम्हांला ठेवा'' असा हिंदू जातीच्या शरीरांतील अवयवाचा तुकडा तोडून घ्यावयासाठीं, उच्चारली गेलेली अपहांरोक्ति ही हिंदुमुसलमानांच्या एकीचे स्वर हिंदूंना गुंग करण्यासाठी पुंगींतून काढणारें महमदअल्ली यांच्या तोंडातून बाहेर पडतात. ''हिंदुमुसलमानांच्यां एकीच्यां सदिच्छेनें प्रेरित झालों आहों'' असे स्वमुखाने सांगत फिरणारे शौकत अल्ली ''आज हजार वर्षें हिंदूंनी आमचे हातचा मार खाल्ला आहे. हिंदूंनी मुसलमानांशीं मिळतें घेतलेंच पाहिजे. आम्ही हिंदूंना भ्रष्ट करीत आलों तें आम्हीं करणारच, तो आमचा धर्मच आहे, आम्हीं मुसलमान संघटना करणारच,



हिंदूंनी मात्र आम्हांला प्रतिकार करण्याचें सोडून हिंदु संघटन व शुद्धि चळवळ ही बंद केलींच पाहिजेत.'' असला मानभावी उपदेश करीत फिरतात. डॉ. किचलू आपण मुर्तिपूजेचे विरोधक आहोंत असें दाखवीत लोकमान्याचे तसबिरीला सभास्थानांतून काढून टाकितात आणि परवा पेशावरच्या मुसलमानांच्या सभेतून सर्व प्रिय (?) हिंदूबंधूंना आव्हान देत सांगतात का, मुसलमान जे जे हक्क मागत आहेत, ते ते त्यांना हिंदूंनी निमूटपणें द्यावे, नाहीं तर अफगाणिस्तान वा इतर कोणत्या तरी मुसलमानी सत्तेचे साह्य घेऊन आम्हीं हिंदुस्थानावर मुसलमानी राज्य स्थापन करु आणि ते म्हणतात कीं, हें मी ७ कोटी मुसलमानांचा प्रतिनिधी या नात्यानें व अल्ली बंधू, अबूल कलाम आझाद इत्यादि मुसलमान पुढाऱ्यांच्या संमतीनें सांगत आहें. हें आलें हिंदुमुसलमानांच्या एकीचे पोवाडे गाणाऱ्या पुढाऱ्यांविषयीं. आतां हिंदुजातीच्या नाशाचें प्रतिज्ञाकंकण बांधलेल्या आगाखान, हसन-इ-झामी इत्यादींकडे पाहुं. हसन-इ-झामी यांनी एक घटना पत्रकच तयार केले आहे. व तदनुसार त्यांच्या नियंत्रणाखाली हजारो मुसलमान ठिकठिकाणीं छलाने वा बलाने हिंदुजातींतील लोकांना भ्रष्टावून मुसलमान करण्याच्या कामीं जिवापाड मेहनत करीत आहेत. हिंदुजातींतून ७ कोटी लोक भ्रष्टांवून कांही विवक्षित कालांत मुसलमान करण्यासांठी तें बद्धपरिकर झालेले आहेत. आगाखानी चाळे तर गुजराथमध्ये सर्व विश्रुतच आहेत. आता इतर भागांतहि त्यांनी तोच उपक्रम सुरू केला आहे. त्यांनीं हिंदुजातीतील संख्या लुटून नेण्याच्या दरोडेखोरीपणांच्या धंद्यासाठीं १ कोटी रुपये भांडवल जमवून, १ कोटी लोक भ्रष्टाविण्याचा विडा उचलला आहे. ही झाली पुढाऱ्यांची स्थिती. आतां मुसलमान जातींतील सर्वसामान्य लोकांची कृति पहा. जन्मामध्यें वाटेल तीं पापें हातून घडली असलीं किंवा घडणार असलीं तरी एक काफर (मुसलमानेतरांना व विशेषत: हिंदूना ते काफर म्हणतात) मुसलमान केला कीं अल्ला सर्व पापाची क्षमा करून व स्वर्गाचीं द्वारें खुली करून अनंत कालपर्यंत आपल्याला स्वर्गसुख देईल असल्या धर्मवेडाच्या भावनेंनें प्रेरित होऊन प्रत्येक मुसलमान संधि साधतांच वाटेल त्या मार्गांचें अवलंबन करीत हिंदूला भ्रष्ट करण्याचा प्रयत्न करतो. या त्याच्या स्वाभाविक धर्मवेडाला खिलाफतीच्या निशेनें धुंद करुन चेतवून दिलेले! मग काय विचारता? दिल्ली, सहारणपूर, नंदुरबार, मालेगांव, कोहट, गुलबर्गा इत्यादिसारखे लहानमोठे व कमी अधिक भयंकर दंगे होतात.